स्थायी निदेश क्र. ०७/२०२३

**नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दिनांक ३१ मार्च २०२३ पूर्वी निर्गमित केलेल्या विविध स्थायी निदेशांच्या अंमलबजावणी बाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र. नपप्रसं/स्थायी नि./०७/२०२३/न.प.प्र.सं./३१-मा.२३/स्था.नि.अं./कक्ष-१२/5297**
**दिनांक :- 03 OCT 2023**

# आदेश

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्यावर सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विविध कलमान्वये आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. शासनाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे बळकटीकरण करून जिल्हा व विभाग स्तरावर नगरपरिषद प्रशासनाची स्वतंत्र कार्यालय निर्माण केली असून त्यांच्यामार्फत अधिनियमातील विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या जात आहे.

०२. नगरपरिषद प्रशासन संचालनालय नगर विकास विभागाचा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून कार्यरत असून नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती) यांच्यावरील सनियंत्रण तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करते. तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय नागरी क्षेत्रातील योजनांची अंमलबजावणी साठी नोडल एजन्सी म्हणून काम करते. शासकीय योजनांची सुयोग्य अंमलबजावणी आणि अधिनियमातील तरतुदींचे पालन करून नगरपरिषदा व नगरपंचायती यांनी आपली विविध कर्तव्य सुयोग्य रीतीने पार पाडण्यासाठी या संचालनालयाने सन २००० पासून ३१ मार्च २०२३ पर्यंत विविध स्थायी निदेश निर्गमित केलेले आहेत.

०३. तात्कालीन परिस्थितीत सदरचे आदेश योग्य असले तरी कालानुरूप महानगरपालिका व नगरपरिषद अधिनियमात झालेले बदल, नव्याने अस्तित्वात आलेली नगरपरिषद लेखा संहिता २०११, केंद्र व राज्य शासन स्तरावर वेगवेगळ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आलेले विविध मिशन, रिफॉर्म अजेंडा, वित्त आयोगाचे वेळोवेळीचे निर्देश, द्विनोंद लेखा पद्धतीचा अवलंब, निविदा प्रक्रिया व खरेदी प्रक्रिया यासाठी शासन स्तरावरून विहित केल्या जाणाऱ्या कार्यपद्धती, वाढत्या संगणीकरणाचा वापर, इत्यादी कारणामुळे अनेक स्थायी निदेशातील निर्देशांचे पालन करणे क्षेत्रीय पातळीवर अडचणीचे ठरत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे या संचालनालयाने पूर्वीचे स्थायी निदेशक क्रमांक

२३, स्थायी निदेश क्र.२३ (पुरक-१) स्थायी निदेश क्र.२३ (पुरक-२) स्थायी निदेश क्र.२६, स्थायी निदेश क्र.३६ व लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पद्धतीच्या अंमलबजावणी बाबतचे परिपत्रक दि. ३१.०१.२००५, २३.०९.२००५, २३.०३.२००६, ३१.०८.२००६ रद्द केले असून नव्याने स्थायी निदेश क्रमांक ०१-२०२३ ते ०४-२०२३ निर्गमित केलेले आहेत.

**०४.** संचालनालयाकडून वेळच्यावेळी निर्देश देण्याची कार्यवाही निरंतर असली तरी पूर्वीच्या सर्व आदेशांचा आढावा घेऊन एकाच वेळी सर्व समावेशक आदेश देण्यासाठी दीर्घ कालावधी लागेल. त्यामुळे वरील परिच्छेदात नमूद केलेल्या रद्द केलेल्या व त्यानंतर नव्याने निर्गमित करण्यात आलेल्या स्थायी निदेशाव्यतिरिक्त उर्वरित स्थायी निदेशांच्या बाबतीत जोपर्यंत सुधारित आदेश निर्गमित केले जात नाहीत तोपर्यंत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाच्या कार्यवाहीसाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) “जे स्थायी निदेश आज रोजी अमलात असलेल्या सर्व अधिनियमातील तरतुदी, नगरविकास विभागाचे वेळोवेळीचे आदेश, रद्द न केलेले स्थायी निदेश व विभागाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजासाठी स्वीकारलेले इतर सर्व विभागांचे आदेश यांच्याशी पूर्णपणे सुसंगत आहेत” ते जसेच्या तसे पुढे चालू राहतील.

२) मात्र वरील १ मध्ये नमूद केलेल्या स्थायी निदेशात कालानुरूप परिस्थितीनुसार बदल करणे आवश्यक आहे असे विभागीय सह आयुक्त यांचे मत असेल; किवा असे मत असल्याबाबत त्या विभागातील जिल्हा सह आयुक्त स्वताहून किवा नगरपरिषद मुख्याधिकारी यांचे अहवालानुसार कळवतील; अशा वेळी संबंधित विभागीय सह आयुक्त प्रारूपासह परिपूर्ण प्रस्ताव मान्यतेसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करतील. या निश्चित केलेल्या कार्यपद्धती व्यतिरिक्त संचालनालयास थेट प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही.

३) जे स्थायी निदेश आज रोजी अमलात असलेल्या सर्व अधिनियमातील तरतुदी, नगरविकास विभागाचे वेळोवेळीचे आदेश, रद्द न केलेले स्थायी निदेश व विभागाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजासाठी स्वीकारलेले इतर सर्व विभागांचे आदेश यापैकी कोणत्याही बाबीशी अंशतः किंवा पूर्णतः विसंगत असतील त्याप्रकरणी संबंधित नगरपरिषद/नगरपंचायती मुख्याधिकारी खालील प्रमाणे कार्यवाही करतील.

(अ) संबंधित नगरपरिषद / नगरपंचायती मुख्याधिकारी सदरची विसंगती संबंधित जिल्हा सह आयुक्त यांच्या अभिप्रायासह विभागाचे विभागीय सह आयुक्त यांच्य निदर्शनास आणून याबाबत त्यांना कोणती कार्यवाही अभिप्रेत आहे याबाबत सुस्पष्ट मार्गदर्शन मागवतील.

(ब) मार्गदर्शन मागवितांना ते केवळ प्रश्नार्थक असणार नाही. याबाबत स्पष्टपणे विसंगती

नमूद करणे व संबंधित मुख्याधिकारी यांची नेमकी काय धारण आहे हे स्पष्ट करणे आवश्यक राहील. तसेच त्यासाठी त्यांनी कोणत्या नियमाचा आधार घेतला आहे त्याचे सादर करणे बंधनकारक असेल.

(क) ज्या प्रकरणी नियमात सुस्पष्ट तरतुदी विभागीय सह आयुक्त यांना दिसून येतील व या प्रकरणी एका निष्कर्षाप्रत विभागीय सह आयुक्त आल्यास त्याप्रमाणे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या वतीने विभागीय सह आयुक्त या प्रकरणी संबंधित नगरपरिषद / नगरपंचायती मुख्याधिकारी यांना मार्गदर्शन करतील.

(ड) वरील (क) प्रमाणे दिलेले मार्गदर्शन पूर्वीच्या स्थायी निदेशातील निर्देशांच्या विसंगत असले तरी या मार्गदर्शनाप्रमाणे केलेली कृती पूर्वीच्या स्थायी निदेशाच्या उल्लंघन करणारी बेकायदेशीर कृती मानली जाणार नाही. सबळ कायदेशीर आधार असलेल्या या मार्गदर्शनानुसार केलेल्या कार्यवाही विधी ग्राह्य असतील.

(इ) विभागीय सह आयुक्त ज्यावेळी असे मार्गदर्शन करतील त्या वेळी सदर पत्राची प्रत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या स्थायी निदेश निर्गमित करणारे कार्यासन व संबंधित कार्यासनास पाठविणे बंधनकारक असेल

४) ज्या प्रकरणी नगरपरिषद / नगरपंचायती मुख्याधिकारी यांनी मार्गदर्शन अपेक्षिले आहे मात्र त्याप्रकरणी विभागीय सह आयुक्त यांना निर्णय घेण्यासाठी संभ्रम निर्माण होत आहे केवळ अशाच प्रकारची प्रकरणी नगरपरिषद प्रशासन संचालनालयास पुढील मार्गदर्शनासाठी पाठविण्यात यावीत.

**०५.** हे आदेश केवळ ३१ मार्च २०२३ पूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या व रद्द न करण्यात आलेल्या स्थायी निदेशांसाठी निर्गमित करण्यात आले असून या आदेशाचा आधार संचालनालयाची इतर आदेश किंवा पत्रव्यवहारासाठी घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

Manoj Vijay Ranade
Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2023.10.03 12:25:02 +05'30'

**(मनोज रानडे भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई**

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

१) मा. प्रधान सचिव ( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये ( सर्व ).

३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा , महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.

४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,सर्व विभाग.

५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई ( सर्व कार्यासन ).

६) निवड नस्ती.

प्रति,

१) जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व ).

२) अध्यक्ष /प्रशासक , नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).

३) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)